## व्यवसाय / धंधा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २८९ वा | मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# 'शेतकऱ्यांचा सात बारा करून घेऊ कोरा, नाहीतर सरकारचे वाजवू बारा', बच्चू कडूंचा एल्गार

**अमरावती (कटूसत्य वृत्त):-** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर आणि दिव्यांगांच्या प्रश्नांवर गुरूकूंज मोझरी येथे आठ दिवस अन्नत्याग आंदोलन केले. सरकारने लेखी आश्वासन दिल्यानंतर कडू यांनी आंदोलन स्थगित केले.

सरकारने शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, पण अजूनही अनेक मागण्यांवर तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे बच्चू कडू हे आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांच्या मूलभूत हक्कांसाठी येत्या ७ जुलैपासून १३८ किलोमीटरची पदयात्रा सुरू केली जाणार असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षातर्फे सांगण्यात आले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या अमरावती जिल्ह्यातील पापळ येथून पदयात्रेला प्रारंभ होणार असून दोनद, उंबर्डा बाजार, लोही, तरणोडी, मानकी, तळेगाव, दारव्हा, वळसा, लाखखिंड, तिवरी, चिरकूटा, तूपटाकळी, वसंतनगर, काळी दौलत, माळकिन्ही, गुंज, या गावांमधून ही पदयात्रा १४ जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण (साहेबराव करपे- पहिली शेतकरी आत्महत्या झालेले गाव) आंबोडा येथे पोहोचणार आहे. एकूण सात दिवसांत १३८ किलोमीटरचे अंतर पदयात्रेच्या माध्यमातून पार केले जाणार आहे. 'सात बारा करून घेऊ कोरा, नाहीतर सरकारचे वाजवू बारा', असा नारा यावेळी देण्यात आला आहे.



तत्काळ कर्जमाफी करा, सक्तीची कर्जवसुली थांबवा, शेतकरी आत्महत्या रोखणारी धोरणे तत्काळ लागू करा, विधवा व दिव्यांगांसाठी रोजगार, सुरक्षा योजनांची अंमलबजावणी, मनरेगा अंतर्गत पेरणी ते कापणीपर्यंत कामांचा विस्तार आणि मजुरी वाढविणे, तरूणांसाठी शिक्षण व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, या मागण्यांसाठी ही पदयात्रा काढली जात आहे. ही यात्रा केवळ एका राजकीय व्यक्तीची नसून, ती शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या हक्कासाठीची लोकचळवळ आहे.

सक्तीची कर्जवसुली थांबवणे आणि तत्काळ कर्जमाफी लागू करणे या प्रमुख मागण्यावर ही यात्रा केंद्रित असणार आहे. दरम्यान प्रत्येक ठिकाणी सभा, संवाद आणि स्थानिक अडचणी समजून घेण्यासाठी थांबे घेतले जातील, असे बच्चू कडू यांनी सांगितले आहे. आम्ही सरकारकडे शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांवर मागण्या केल्या आहेत. त्या एकट्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या मागण्या नाहीत. त्या सर्वसामान्यांच्या आहेत. त्या सरकारने पूर्ण केल्या पाहिजेत, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

# दौंड-कुलबर्गी-दौंड रेल्वेला तीन महिन्यांची मुदतवाढ

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दौंड-कुलबर्गी-दौंड रेल्वेची सेवा बंद होणार होती, मात्र खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नांमुळे तीन महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. पुणे येथे मध्य रेल्वेच्या महाप्रबंधकांशी झालेल्या बैठकीत खासदार मोहिते-पाटील यांनी ही रेल्वे सेवा नियमित चालवण्याची आणि मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, ही रेल्वे पुढील



तीन महिने सुरू राहणार आहे.

या रेल्वे सेवेमुळे दौंड, कुर्डूवाडी, माढा, सोलापूर, कुलबर्गी आणि परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. खासदार मोहिते-पाटील यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी आणि स्थानिकांच्या मागण्यांचा विचार करून हा प्रश्न लावून धरला. त्यांच्या या प्रयत्नांचे स्थानिक नागरिकांनी आणि प्रवाशांनी स्वागत केले. खासदार मोहिते-पाटील यांनी ही दौंड कुलबर्गी दौंड सेवा कायमस्वरूपी सुरू राहावी यासाठी रेल्वे बोर्डाकडे प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.

# सोलापूर शहर पाणीपुरवठ्यातील दुजाभाव थांबवा !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरात होणारा पाणीपुरवठ्याचा दुजाभाव थांबवावा व असमतोल अन्यायकारक पाणीपुरवठा प्रश्नी पालकमंत्री यांनी तात्काळ लक्ष घालून संपूर्ण शहराला समान दिवसाड, नियमित, सुरळीत, एकसमान पद्धतीने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करावे अशी आग्रही मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी ॲड. मनीश गडदे पाटील यांनी केली आहे.

सोलापूर शहरातील पाणीपुरवठा करिता समांतर जलवाहिनीचे काम अनेक नैसर्गिक, सरकारी अडथळ्यांची संकटे पार करीत एकदाची पूर्ण झाली आणि नुकतीच पाकणी/ सोरेगाव येथील जलकेंद्रात पाणी पोहचले याचा मनस्वी आनंद झाला. यावर्षी निसर्गाच्या कृपेने जून महिन्यात उजनी जलसाठा ७३% झाला ही सुद्धा जमेची बाजू आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत असलेला पाणीपुरवठा शहराच्या काही विशिष्ट भागात चार ४दिवसाड आणि उर्वरित भागात पाच ५दिवसाड असा करण्यात येत आहे. आता तर तीन ३दिवसाड करण्याची घोषणा करण्यात आली आहे. परंतु शहरातील रहिवासी कुटुंबीयावर आजरोजी असमतोल पद्धतीने पाणीपुरवठा करून सोमपा अन्याय करत



आहे अशी लोकभावना होत आहे. यामध्ये पाच ५दिवसाड पाणीपुरवठा हा हद्दवाढ भाग, झोपडपट्टी गुंठेवारी ठिकाणी होत असल्याची नागरिकांची चर्चा आहे. खरंतर असे असेल तर ही

> शहराचा पाणीपुरवठा सर्व भागात एकसमान पद्धतीने व एकसमान दिवसाड झाला पाहिजे अशी आमची मागणी आहे. हा सोलापूरच्या सोशिक, सहनशील जनतेवर होणारा सरकारी अन्याय आपण गंभीर्याने नोंद घेऊन 'पालक' या नात्याने दूर करावा हीच आग्रही विनंती अन्यथा नाईलाजास्तव सामान्य सोलापूरकरांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने काँग्रेस पक्षाला व्यापक जनआंदोलन उभारावे लागेल याची नम्र नोंद घ्यावी. असा इशारा देण्यात आला आहे.
>
> **- ॲड मनीश गडदे पाटील**
> सेक्रेटरी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी मुंबई

बाब अतिशय क्लेशदायक असे आम्हाला वाटते.

सोमपाच्या अखत्यारीतील संपूर्ण शहर व येथील सर्व नागरिक रहिवासी जनता ही सोमपा करीता संविधानानुसार समान आहे परंतु सोमपा प्रशासन सर्वांना समान पाणीपट्टी घेऊन सुद्धा पाणीपुरवठ्यात मात्र दुजाभाव करत आहे. शासन प्रशासन जनतेच्या प्रति असलेल्या समतेच्या तत्वांचे उल्लंघन करून घटनात्मक तरतुदींची पायमल्ली करत आहे अशी शंका वाटते. या सोमपाच्या अत्यंत गंभीर बाबीकडे 'पालकमंत्री' यांचे लक्ष वेधू इच्छितो असे ॲड. मनीश गडदे पाटील यांनी सांगितले.

# हरी नामाच्या गजरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.





धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. गोरे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, माजी आमदार राम सातपुते, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलीच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील नगारा व अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

पालखी स्वागतानंतर पालकमंत्री गोरे व प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधीनी हरी नामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर काही अंतर चालत गेले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सोनिया यांनी फुगडी खेळत रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल नामाचा जयघोष केला. तसेच पालकमंत्री महोदय व माजी आमदार राम सातपुते यांनी ही फुगडी खेळली.

**सातारा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण निरोप**

सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी 10.00 वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी, सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी यासणी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, फलटणचे उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भक्तीमय वातावरणात भावपूर्ण निरोप दिला.

जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल
नामघोषाने आसमंत दुमदुमला...
टाळी वाजवावी, गुढी उभी रहावी,
वाट ती चालावी पंढरीची

या संत वचनानुसार टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने जय हरी विठ्ठल... जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा... तुकाराम चा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी पंढरीचे अंतर एक एक पाऊल जवळ करीत होता.

**वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज, वारकऱ्यांसाठी फूट मसाजची व्यवस्था**

पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. हिरकणी कक्षाच्या माध्यमातून महिला वारकरी मंडळी तसेच लहान मुलांसाठी उत्कृष्ट सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच वारकऱ्यांना पायी चालून त्रास होऊ शकतो त्यामुळे त्यांना आराम मिळावा यासाठी फूट मसाज मशीन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे.

धर्मपुरी येथे पालखी अगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने **(पान 2 वर..)**

# जिथं बाळासाहेबांचं पहिलं भाषण, तिथंच राज-उद्धव ठाकरे एकत्र

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक दिवसांपासूव मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या युतीची चर्चा चालू आहे. विशेष म्हणजे आमच्या दोघांत थेट जरी नसली तरी एकत्र येण्याबाबत चर्चा चालू आहे, असे ठाकरे यांनी सांगितले आहे.

दरम्यान, या युतीआधी दोन्ही ठाकरे बंधू 5 जुलै रोजी विजयी मेळाव्याला मुंबईत एकत्र येणार आहेत. विशेष म्हणजे या मेळाव्याचे आता ठिकाणही ठरले आहे. जिथं शिवसेनाप्रमुख तथा दिवंगत नेते

**मुंबईच्या विजयी मेळाव्यात एल्गार!**




बाळासाहेब ठाकरे यांचे पहिले भाषण झाले होते, त्याच ठिकाणी आता राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार आहेत. **(पान 2 वर..)**

# माझ्या नावाचा बोर्ड कचऱ्यात टाका, पण बोरामणी विमानतळ करा - सुशीलकुमार शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरांतर्गत असलेले होटगी रोड विमानतळ किती दिवस चालणार? सुरू झाल्यापासून एकदाही पूर्ण क्षमतेने प्रवासी उपलब्ध झाले नाहीत. शहराचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असल्यास आंतरराष्ट्रीय दर्जाचे बोरामणी विमानतळ होणे आवश्यक आहे.

सत्ताधाऱ्यांनी माझ्या नावाचा बोर्ड काढून टाकत तो कचऱ्यात टाकावा, परंतु बोरामणी विमानतळ विकसित करा, अशी खंत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली.

हेरिटेज येथे झालेल्या एका कार्यक्रमात माजी केंद्रीय गृहमंत्री शिंदे व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील एकाच व्यासपीठावर होते. शहर व जिल्ह्याच्या विकासावर ते बोलत होते.



यावेळी शिंदे पुढे म्हणाले, निवडणुकीत जो विजयी मिळेल असे वाटते, तो पाडला जातो. सोलापूरकरांनी मला सर्वसाधारण जागेवर दोनदा खासदार केले; मात्र राखीव जागेवर माझा पराभव झाला.

आम्ही प्रभावीपणे काम केले, लोकांनी ते स्वीकारले नाही. नाराज न होता काम केले पाहिजे, ते आम्ही करत आहोत. लोकशाहीत चिंतन केले पाहिजे. बोरामणी विमानतळासाठीची जागा जरी माझ्या कारकिर्दीत संपादित केली असली तरी भविष्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ होण्यासाठी सुशीलकुमार शिंदे हे नाव काढून कचऱ्याच्या पेटीत टाकलं तरी चालेल; पण विमानतळ होणे महत्त्वाचे आहे.

बोरामणीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ व्हावे, यासाठी अनेक वर्षे मी प्रयत्न केले. मात्र काही लोकांचा हट्टी स्वभाव असतो की इथंच झालं पाहिजे. पण, इथं कसं? सोलापूर शहरांतर्गत असलेले होटगी रोड विमानतळ सध्या सुरू झाले आहे. पण, ते किती दिवस टिकणार आहे? आतापर्यंत पूर्ण क्षमतेने प्रवासी उपलब्ध झाले नाहीत. आम्ही म्हणतो की ठिक आहे, सत्ता त्यांची आहे. तेवढं तरी चालू द्या. पण तेही विमानतळ चालत नाही.

# दहा हजाराची लाच मागणाऱ्या महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यास अटक

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** शेत जमिनीत शेती पंपाचे पोल उभारून विद्युत पंपाला कनेक्शन देण्यासाठी दहा हजार रुपयाची लाच मागितलेल्या सहाय्यक अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

दिग्विजय आबासाहेब जाधव, पद- सहाय्यक अभियंता,



(वर्ग-२) नेग नेमणूक महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. शाखा कार्यालय जेऊर ता. करमाळा जि. सोलापूर असे त्या अभियंत्याचे नाव आहे. यातील तक्रारदार यांनी त्यांचे आईचे नावे असलेल्या शेत जमीनीमध्ये शेती पंपाचे विद्युत कनेक्शन मिळणेकरीता महावितरण कार्यालय जेऊर येथे अर्ज / प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्याचा पाठपुरावा हे तक्रारदार करत होते. **(पान 2 वर..)**







## संपादकीय

# पालक व्हा, मालक नाही?

पालक जर मालक झाले, तर मुलं हरवतात. पण पालक जर मित्र, मार्गदर्शक आणि विश्वासू सहकारी झाले, तर मुलं बहरतात, फुलतात, उंच उडायला शिकतात. म्हणूनच पालक व्हा, मालक नाही. आजच्या काळात शिक्षण हे मुलांसाठी सर्वांगीण विकासाचं साधन न राहता स्पर्धेचं रणांगण बनलं आहे. नीट, जेईई सारख्या परीक्षांचं दडपण, त्यावर पालकांच्या महत्त्वाकांक्षांचं ओझं आणि त्यात मुलांच्या भावना, स्वप्नं, हक्क या सगळ्यांचा श्वास गुदमरतो आहे.

अनेक पालक शिक्षणात केलेल्या खचार्चं रूपांतर 'गुंतवणूक' समजून 'गुणांचा परतावा' मागतात. पण हे समीकरण जेव्हा माणुसकीवरच बेततं, तेव्हा त्याचे परिणाम भयावह होतात, कधी आत्महत्या, तर कधी एक आयुष्यभराचं मनोविकाराचं सावट.

नीट, जेईई सारख्या कठीण परीक्षांच्या शर्यतीत, वडिलांनी मुलीच्या खांद्यावर आपल्या अपेक्षांचं ओझं टाकलं आणि तिच्या मनाला न विचारता तिला त्या मार्गावर चालायला लावलं. तेही कोणी सामान्य वडील नव्हते, मुख्याध्यापक होते. त्यांनी तिच्यासाठी महागडा क्लास लावला. सराव चाचणी परीक्षेत अपेक्षित गुण न आल्याने त्यांचा राग अनावर झाला.

मी भरमसाठ पैसे खर्च करतोय, मग गुण तर हवेच, अशी 'गुंतवणूक-परतावा' ही बाजारू भाषा त्यांनी आपल्या लेकरासाठी वापरली. लेकीनेही प्रश्न विचारला, 'तुम्ही अभ्यास केला होता का? तुम्ही कलेक्टर झाला नाही ना, शिक्षकच झाला आहात!' तिचं हे प्रत्युत्तर वडिलांच्या अहंकाराला टोचलं आणि तेव्हा सुरू झाला अमानुषपणाचा तांडव.

त्यांनी तिला अमानुषपणे मारहाण केली. त्या निष्पाप पोरीचा प्राण निघून गेला होता. या घटनेने अंतर्मन हादरले. काळजाचा ठोका चुकला. मन उदास झाले. शब्द हरवले, भावना सुन्न झाल्या.

हल्लीच्या काळात पालक-लेकरांमधील नातं समजुतीच्या आधारावर न टिकता, अपेक्षांच्या ओज्याखाली गुदमरताना दिसत आहे. अनेक पालक आपल्या मुलांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर अपूर्ण महत्त्वाकांक्षांचं ओझं लादताना दिसतात. माझं लेकरू डॉक्टरच व्हायला हवं, इंजिनिअरच व्हावं ही मानसिकता इतकी खोल रुतली आहे की, त्या कल्पनांच्या भोर्वयात मुलांचं स्वतंत्र अस्तित्वच हरवून जातं.

या विचारातून निर्माण होते ती अव्याहत स्पर्धा, जिथं यशाची व्याख्या फक्त मार्कांमध्ये आणि करिअरच्या गोंडस नावांमध्ये मर्यादित केली जाते. परिणामतः मुलांच्या मनावर असह्य दडपण येतं आणि त्यांच्या कोवळ्या भावविश्वात असुरक्षिततेची छाया गडद होत जाते. शिक्षण ही व्यक्तिमत्त्व निर्मितीची प्रक्रिया न राहता, ती यशाच्या खुचीर्साठीची चढाई ठरते, जी नात्यांनाच गिळंकृत करू लागली आहे.

पालकत्व म्हणजे पाठराखण, समजूत आणि प्रेमाचा हात असायला हवा; पण आज ते अधिकतर वेळा यशाचा ठेकेदार होऊ पाहतं. हे वास्तव समाजमनाला खडबडून जागं करणं अत्यावश्यक झालं आहे. पालक त्यांच्या मतांचा, भावना, आवडीनिवडींचा विचार करत नाहीत. पालकांना वाटतं आपण पैसे खर्च करतो, मग निर्णयही आपलेच असतील! मुलांचं आयुष्य, शिक्षण, शाळा, अभ्यासक्रम, करिअर सगळं काही पालकच ठरवतात.

मुलांना केवळ पालकांच्या अपेक्षांचं मशीन समजलं जातं. त्या यंत्रासारख्या वागवल्या जार्णाया मुलांनी अपेक्षेप्रमाणे गुण मिळवलेच पाहिजेत, टॉपर राहिलेच पाहिजे अशी हट्टाची धारणा केली जाते, पण हेच मशीन जर यंत्रणेच्या दबावात अडकलं, तर त्याचा विस्फोट पालकांच्या लक्षात येईपर्यंत फार उशीर झालेला असतो.

अनेक पालक आपल्या अपूर्ण आकांक्षा मुलांकडून पूर्ण करून घेऊ पाहतात. महागडे क्लासेस, उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा या सगळ्यांचा उद्देश आपली सामाजिक प्रतिष्ठा टिकवणे असतो. त्यात मुलांच्या क्षमतेचा, त्यांच्या भावनांचा विचारच होत नाही. मार्क्स मिळाले नाहीत, की बिनशर्त प्रेमाचं नातं तुटतं. पालक मुलांवर पैसे लावतात आणि अपेक्षा करतात की त्या बदल्यात गुण मिळालेच पाहिजेत. ही गुंतवणूक-परतावा मानसिकता मुलांना माणूस न समजता प्रॉडक्ट समजते.

दहावी, बारावीमध्ये गुण मिळाल्यानंतरही अनेकांना नीट किंवा जेईई परीक्षेत अपयश येतं. या परीक्षांची तयारी करताना मुलांच्या मनावर प्रचंड दबाव असतो. प्रत्येक प्रश्न, प्रत्येक चूक, प्रत्येक सराव पेपर ही जणू परीक्षा नव्हे, तर शिक्षेची चौकट वाटते. घरातही तोच ताण, तोच अपेक्षेचा भार. संवाद हरवतो. हसणं विरतं. मौन वाढतं. पालकांना मुलांच्या आतल्या कोलाहलाची जाणीव होत नाही.

ते पाहतात गुण, पण ओळखत नाहीत त्या मागचं गोंधळलेलं मन. राजस्थानमधील कोटा हे या सगळ्याचं जिवंत उदाहरण आहे. तिथे हजारो पालक आपल्या मुलांना पाठवतात, टॉपर्स बनण्यासाठी. पण अनेक मुलं नैराश्यात अडकतात. आत्महत्या करतात. त्यांचं आयुष्य कागदावर लिहिलेल्या गुणांपेक्षा खूप मोठं असतं, पण ते कुणाच्या लक्षात येत नाही. कोटासारखी ठिकाणं मुलांचं रक्त, घाम आणि अश्रूंनी व्यापली आहेत.

या सगळ्यामागे मूलभूत प्रश्न आहे, आपलं पालकत्व आपण समजून घेतलं आहे का? पालक होणं म्हणजे एक हक्क नव्हे, ती एक जबाबदारी आहे. मुलं आपली असतात, पण त्यांचं भविष्य आपल्यासारखं असावं ही अपेक्षा चुकीची आहे. खलिल जिब्रान म्हणतात, 'मुलं तुमच्यापासून आली असली, तरी ती तुमची नाहीत. ती काळाच्या ओघातली अपत्यं आहेत. मुलांना स्वातंत्र्य, व्यक्तिमत्त्व, आत्मसन्मान हे सर्व मिळायलाच हवे. त्यांचं अस्तित्व स्वतंत्र आहे. त्यांच्यावर आपल्या अपयशाचं ओझं टाकणं म्हणजे त्यांचं बालपण गिळंकृत करण्यासारखे आहे.

आपण समाज म्हणून पालकत्वाची जबाबदारी घेत आहोत का? प्रत्येक शाळेत समुपदेशक असायला हवा. पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरे असायला हवीत. शैक्षणिक व्यवस्थेने मुलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष द्यायला हवं. पण त्याहीपेक्षा आधी पालकांनी स्वतःमध्ये बदल घडवायला हवा. मुलांचं यश ही आपल्या पालकत्वाची परीक्षा नाही. त्यांचं अपयश ही आपली लाज नाही. प्रेम देणं, समजून घेणं आणि त्यांच्या प्रवासात सहभागी होणं हेच पालकत्व आहे.

पान १ वरून

## दहा हजाराची लाच मागणाऱ्या...

तक्रारदार यांचे आईचे नावे असलेली शेती जमीन मध्ये शेती पंपाचे विद्युत कनेक्शन करीता महावितरण कार्यालय जेऊर यांचेकडून विद्युत पोलची उभारणी करुन विद्युत कनेक्शन देण्याकरीता दिग्विजय आबासाहेब जाधव, पद सहाय्यक अभियंता, यांनी तक्रारदार यांचेकडे १०,००० रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्वीकारण्याची संमती दिल्यावरुन लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई उमाकांत महाडिक, तत्कालीन पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर. पोलीस अंमलदार शिरिषकुमार सोनवणे, अतुल घाडगे, सलिम मुल्ला, स्वामीराव जाधव, राहुल गायकवाड सर्व नेम. ला.प्र.वि., सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## हरी नामाच्या गजरात संतश्रेष्ठ...

विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छ्ता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता.

**दर्शनासाठी भाविकांची गर्दी**

सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती.

**नातेपुते येथे पालखीचा मुक्काम**

धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीची पालखी नातेपुते कडे मार्गस्थ झाली.

**वारकऱ्यांसाठी विविध सुविधांचे उद्घाटन -**

आषाढी वारी कालावधी ग्रामविकास विभागामार्फत धर्मपुरी येथे ग्रामविकास विभागाने वारकरी सेवा मसाज केंद्र, वैद्यकीय सेवा कक्ष, हिरकणी कक्ष, मुख्यमंत्री आरोग्य रथ, मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्र, मोफत मोबाईल चार्जिंग पॉईंट, 108 ॲम्ब्युलन्स सेवांचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी केले.

**प्रबोधन**

# निरपेक्ष वारी । वाढवी सामर्थ्य

'वारी हे महाराष्ट्राचं ऐश्वर्य आहे. पायाखालती धरती, डोईवरचं आकाश आणि मनातला देव यासह प्रवाही झालेले पसायदान म्हणजे वारी!' हे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी अत्यंत भाविकपणे प्रौढ भाषेत वारीचं केलेलं वर्णन वाचून भाविक नक्कीच माना डोलावतील. वारी म्हणजे समाजसंपर्क, विचारांची देवाण-घेवाण, समाजशील वृत्तीचा विकास, अंतर्मुख व्यक्तीला बहिर्मुख होण्याची संधी! म्हणून वारी ही संस्कारमूलक परंपरा आहे, असं जुनेजाणते परंपरानिष्ठ म्हणतात. जत्रा, यात्रा, वारीमुळे विशिष्ट दिवशी चहूदिशांनी माणसं एकत्र येऊन पारिवारिक आणि सामाजिक समस्यांवर विचार करीत असतील, तर ते चांगलंच आहे. पण त्यासाठी वारी स्वयंप्रेरित असणं, हे फार गरजेचं आहे. घराण्यात वारी आहे म्हणून वारी करण्याच्या परप्रेरकतेत यांत्रिकपणा आणि मानसिक छळच अधिक असण्याची शक्यता असते. पण वारी, परिक्रमा अशा धर्माचरणात प्रयोगशील शास्त्रज्ञांच्या निष्ठेने कुणीही सहभागी होत नाहीत, अशी खंत जर समाजशास्त्रज्ञ करीत असतील, तर त्यांचं काही चुकलेलं नाही. आंधळ्या भाविकतेला समाजनिरीक्षणाचा डोळसपणा लाभणं गरजेचंच असतं. महात्मा गांधी आणि विनोबाजी भावे यांनी पदयात्रेला देशोद्धाराचं उद्दिष्ट प्राप्त करून दिलं होतं. महात्माजींची दांडीयात्रा हे इतिहासाचं सोनेरी पान ठरलं. विनोबाजींनी भूदानयज्ञासाठी केलेली पदयात्रा हा समता प्रस्थापनेचा महान अहिंसक प्रयोग म्हणून इतिहासात अजरामर झालाय. गांधीजी-विनोबाजींच्या पदयात्रांचं मोल लाखो परिक्रमा, वाऱ्या, यांच्या वाट्याला येणं शक्य आहे? चरैवेति अर्थात, चालत राहा ही महर्षीची आज्ञा आहे. पण चालणं सहेतुक असावं, डोळस असावं, सामाजिक उद्दिष्ट प्रेरित असावं अन्यथा ती जीवघेणी पायपीट ठरते; हेच गांधीजींच्या आणि विनोबाजींच्या आदर्श प्रस्थापनेने सिद्ध होते. निरीश्वरवादी गाडगेबाबा वारीतून कधी देवदर्शनाला गेले नाहीत. पण वारकरी पंढरपुरात पोहोचण्याआधी आपली निःमलग्रामची फौज घेऊन पंढरपुरात जाऊन तेथील नागरिकांचं जीवन सुसह्य करण्यासाठी धडपडायचे! स्वच्छता हाच त्यांचा विठ्ठल होता!

वारीचा प्रारंभ शोधणे अवघड नाही, पण संतवचनांच्या आदेशानेच 'महाराष्ट्राची पाऊले पंढरीची वाट चालत राहिली' यात शंका नाही. संत तुकारामांनी वारी-वारकरी यांना परंपरांचं संत तुकारामांनी वारी - वारकरी यांना परंपरांचं स्मरणही करून दिलं आहे आणि आध्यात्मिक पातळीवरून काही आदेशही दिले आहेत. पंढरीची वारी, आहे माझे घरी । आणिक न करी, तीर्थव्रत. वारीचा कुलाचार सांगताना वारकऱ्यांनी दुसऱ्या तीर्थयात्रा करू नयेत, विठ्ठलभक्ती एकनिष्ठेने करावी, असा एकेश्वरवादही सांगितला होता. पण लक्षात कोण घेतो? पुढे वारीचं माहात्म्य ते सांगतात, पंढरीची वारी, जयांचिये घरी । पायधुळी शिरी, वंदीन त्यांची ॥ वारकरी संप्रदायाला पायाभूत अभंग देताना त्यात पारलौकिक प्रलोभनांची पेरणी करून संत तुकोबा म्हणतात, पंढरीस जाऊ म्हणती। यम थोर चिंता करी ती ॥ ह्या मृत्यूभयमुक्तीसारखीच कुलोद्धार, पापमुक्ती, मोक्षप्राप्तीची प्रलोभनंही वारीशी जोडताना ते म्हणाले, धरिली पंढरीची वाट । पापे रिगाली कपाट। किंवा पंढरीचे वारकरी । ते मोक्षाचे अधिकारी ॥ कुळाच्या उद्धाराविषयी संत तुकाराम म्हणाले, पंढरीचा वारकरी, खेपा वैकुंठबंदरी ॥ आला, गेला, केल्या यात्रा। उद्धारिले कुळा, सर्वत्रा ।। तुकोबांची ही साक्ष कीर्तनकारांच्या किती पथ्यावर पडली आणि बहुजन समाजाला परंपरेच्या दावणीला बांधणं त्यांना किती सोपं गेलं, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

पण विठोबा भक्त तुकारामांपेक्षा मुक्त तुकारामांचा उपदेश वेगळा, कल्याणकारी आणि समाजहितसाधक आहे. कारण भक्तावस्थेपेक्षा मुक्तावस्था व्यापक असते. मुक्त तुकाराम तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी ॥ असं म्हणताना पंढरपूर हे तीर्थस्थान आहे, हे जमेला धरूनच म्हणतात. तीर्थयात्रा, दिंड्या-वाऱ्यांची व्यर्थता त्यांना तीव्रपणे जाणवली म्हणून आपला प्रगल्भ, मुक्त विचार त्यांनी मांडला. ते म्हणतात, तीर्थाचिये पंथे, चाले तो निर्दैव । पाविजेतो ठाव, अंतराय ॥ किंवा देही असोनिया देव। वृथा फिरतो निर्दैव॥ भक्त तुकारामांनी एकादशीव्रत, सोमवार न करिता। कोण त्यांची गती होईल नेणो ॥ असा आग्रह केलाय. पण मुक्त तुकारामांनी नको सांडू अन्न। नको सेवू वन। चिंती नारायण । सर्व भोगी ॥ असा उदारमतवाद सांगून कर्मकांडी व्रतवैकल्यांविरुद्ध निषेध नोंदवलाय. आजवर आपण सनातनी संस्कृतीच्या दडपणाखाली राहून भक्त तुकारामांना स्वीकारलं आणि मुक्त तुकारामांना नाकारलं. आता चिकित्सकपणे मुक्त तुकारामांचा स्वीकार करून आपल्या जीवनाला व्यापक, रूढीमुक्त, अधिक सामाजिक बनवायला हवा. वारीचा खरा अर्थ मुक्त तुकारामच अधिक चांगला सांगू शकतात, एवढं येथे कळणं गरचेचं आहे. कारण-

वारी देशाटन। वारी पर्यटन
सामाजिक ज्ञान। वारीपोटी ॥ १
सामाजिक भान । वाढविते वारी
भेदभाव दरी। मिटतसे ॥२
वारी जे करती। स्वयंप्रेरणेने
लाभाला न उणे। राही त्यांच्या ॥ ३
निरपेक्ष वारी । वाढवी सामर्थ्य
होई अधःपात। अपेक्षेने ॥४
कुणी काही द्यावे । आपण ते घ्यावे
संतांना पुसावे। बरे का ते? ॥५
भिक्षुकवृत्तीला । तुका नाकारती
आणावे ते चित्ती । यात्रिकांनी ॥ ६
गाडगेबाबांनी। आधी काम केले
दोन घास घेतले। हक्कानेच ॥७
थोरांचा आदर्श। सर्वांनी जपावा
उणेपणा यावा । हे न, बरे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# पाऊस पडता । अडवावे पाणी

जगात तशी आश्चर्याची कमतरता नाही, पण जगाचा सत्तर टक्के भूभाग पाण्याने व्यापला असताना लोकांनी पाणी पाणी अशी हाकाटी करावी, हे केवढं मोठं आश्चर्य! शहाणी माणसं तर 'भविष्यकाळी पाण्यासाठी समाजात संघर्ष होईल,' असा इशारा गंभीरपणे देत आहेतच. त्यामुळे पाण्याच्या इतर वर्गीकरणापेक्षा पेयजल आणि अपेयजल असे प्रकार करणंच योग्य वाटतं. समाजाच्या कल्याणाची चिंता करणाऱ्या एका सुभाषितकाराने वृथा दृष्टि समुद्रेषु-अर्थात, समुद्रावर पाऊस पडून काय उपयोग? असं म्हटलं आहे. कारण पावसाचे गोडं पाणी समुद्रात मिसळल्याने ते इतकं खारट होतं की, जनावरानेही त्याला तोंड लावू नये. जनावराचं राहू द्या, हे खारं पाणी कोणत्याही वनस्पतीला किंवा पिकाला चालत नाही. भारतीय संस्कृतीने समुद्राला समुद्रदेवता असा खूप मोठा भक्तिवाचक, सन्मानयुक्त शब्द वापरला असला, तरी समुद्र पिण्याचं पाणी देऊ शकत नाही आणि जगातील गोडं पाणी खारट करून सोडतो, हे वास्तव आहे.

विसाव्या शतकाने प्रदूषणासारख्या ज्या आपत्ती मानवजातीवर आणल्या, त्यात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची आपत्ती सर्वाधिक भयंकर आणि त्रासदायक आहे. म्हणूनच आधी परदेशातील शहरांमधून आणि नंतर भारतातील शहरांमधून पाणी वाचवा (Save Water) चे फलक समाजाला पाणीटंचाईची जाणीव जागृत करण्यासाठी रस्तोरस्ती लागले. पण परदेशात सार्वजनिक हिताच्या बाबींविषयी जे गांभीर्य आवश्यक असतं; ते आमच्या रक्तात कधीच नसतं, मग मेंदूत ते कसं असणार? पाणी वाचवाचा बोर्ड वाचायचा आणि त्याच्याखालीच असलेला सार्वजनिक नळ धो धो वाहू द्यायचा, हा मख्खपणा हे आमचं खास वैशिष्ट्य आहे.

भारताच्या बहुसंख्य ग्रामवासीयांना पिण्याच्या पाण्याची टंचाई इतकी जाणवते की, पाच-पाच मैलांचा परिसर पायाखाली घालूनही घागरभर पाणी मिळवणं कठीण असतं. भूगोलतज्ज्ञांच्या मतानुसार, जगात गोडं पाणी जरी तीन टक्के असलं तरी, त्यातील अर्धा टक्कासुद्धा पाणी पिण्यायोग्य नसल्यावर हाहाकाराशिवाय दुसरं काय घडणार? म्हणून जगातील सर्व राष्ट्रांनी पिण्याच्या पाण्याची साठवण करण्याचा एक कलमी कार्यक्रमच यापुढे राबवला पाहिजे, नाहीतर जगाची काही धडगत नाही. भविष्यकाळात सोनं-चांदी, हिरेजवाहीर यावरील बंदोबस्त काढून विहिरी-तलावांवर पाण्याच्या रक्षणार्थ खडी फौज ठेवावी लागेल.

पण ही वेळ येण्यापूर्वी आपण बरंच काही करू शकतो. पर्यावरणतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, एकूण पडणाऱ्या पावसाच्या ७७ टक्के पाणी पुन्हा समुद्रास मिळतं. आपण यातील बरंच पाणी अडवू शकतो आणि जमिनीत खाचा-खड्डे मारून, शेततळी, पाझरतलाव बांधून, नदी, नाले, ओढे, ओहोळ, झरे, पाझर साठवू शकतो. पाणी वाचवा या घोषणेचे अर्थ दोन प्रकारे घ्यायला पाहिजेत. पैकी पहिला अर्थ सर्वपरिचित आहे, तो म्हणजे, पिण्यायोग्य पाण्याची नासाडी न करणं आणि दुसरा अर्थ आहे, गोडं पाणी समुद्राला जाऊन मिळण्याआधी अडवणं. समुद्राला जाऊन मिळणं हा गोड्या पाण्याचा साक्षात मृत्यूच आहे, हे लक्षात घेतल्यास पाणी वाचवाचा दुसरा अर्थ कळेल.

राजस्थानसारख्या रूक्ष, ओसाड, वाळवंटी प्रदेशाला सुजलाम् करण्याची किमया करणाऱ्या डॉ.राजेंद्र सिंग यांचं पाणी वाचवणं पाहिलं, राजस्थानभर त्यांनी निर्माण केलेले जोहड पाहिले, म्हणजे एक कल्पक मनुष्य आपल्या दीर्घोद्योगाने मानवजातीला कसा सुखी करू शकतो, ते कळेल. निसर्गाच्या अवकृपेतून राजस्थान जर मुक्त होऊ शकतो, तर निसर्गाची कृपा लाभलेली इतर भारतीय राज्यं आणि जगभरातील अन्य देश जीवनाधार पाण्याच्या चिंतेतून कायमचे मुक्त का होऊ शकणार नाहीत? महात्मा फुले यांनी दीडशे वर्षांपूर्वीच पाणीटंचाईचं संकट ओळखलं होतं. आपल्या अखंडात ते प्रश्न करतात, जप-अनुष्ठाने पाऊस पाडती। आर्य का मरती जळाविण ॥ जपजाप्याने, यज्ञयागाने पाऊस पाडण्याच्या थापा अंधश्रद्धाप्रसारक फुकटे भट-ब्राह्मण, मांत्रिक-तांत्रिक मारतात आणि त्या थापांना माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदेंसारख्या महिला बळी पडून यज्ञयाग, बेडकांची लग्नं लावण्याचे आचरट उद्योग आरंभतात; याला काय म्हणावं? त्यापेक्षा सर्व मुख्यमंत्री आपल्या राज्यात चार वर्षं पुरेल असा गोड्या पाण्याचा संचय करतील तर वैज्ञानिक युगाला साजेसा ठरेल. कवी रहीम म्हणतात, रहिमन पानीराखिए। बिन पानी सब सून ॥ पाण्याचं रक्षण करा, कारण त्याशिवाय जीवन शून्य आहे; हे आपण कधी लक्षात घेणार? कारण-

आंधळा पाऊस पडे पृथ्वीवर
वाहतसे नीर। चारी वाटा ॥१
थांबला पाऊस। पाणी लुप्त झाले
लोक जागे झाले । तृषावेडे ॥ २
पाऊस पडता। अडवावे पाणी
संधी येते नामी। एकदाच ॥ ३
थांबवावे पाणी। भराव्या विहिरी
पाऊस लहरी। ध्यानी घ्यावे ॥४
बांधावी धरणे। बांधावीत तळी
पाणी सर्वकाळी। लागते ना? ॥५
शत्रूवरसुद्धा । संकट पाण्याचे
येऊ नये याचे भान ठेवा ॥ ६
जलसंधारण। राष्ट्रकार्य थोर
पाण्याचा विचार । सर्वश्रेष्ठ ॥७
शुद्ध पेयजल । हक्काने मिळावे
तरीच म्हणावे। राष्ट्र मोठे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## पैसा मिळवण्याचा नाद

माणूस मिळवण्यासाठी पैसा
वागतोय मनाला येईल तसा
पैसा मिळवण्याच्या नादात
उतरतोय कोणत्याही धंद्यात

पैशाची अति हाव बरी नाही
माणसाला कळणार का नाही?
पैशाच्या अति हव्यासामुळे
माणूस माणसाला जिवंत जाळे

पैसा आहे दुःखास कारणीभूत
ठेवा मनाला पैशापासून काबुत
मेल्यावर सगळ्या पैशाला
जाई माणूस सोडून दुसऱ्याला

माणूस सारखा पैसा पैसा करून
जाईल एकदिवस कायमचा मरून
पैशासाठी माणसाची धावपळ
करत आहे दुःखाला जवळ

पैसा मिळवण्यासाठी माणूस
होत आहे माणसाचा कानूस
सख्ख्या भावासोबत वैर करून
येतोय कोर्टाला खेट्या मारून

माणूस पैशासाठी तोडतोय नाते
पैशापोटी त्याला काहीच न वाटे
पैसा झालाय माणसाला प्राणप्रिय
नाही बोले त्याला कोणी माननीय

कोण सांगे त्याला पैसा नाही सर्व
कळत नाही का करतात पैशाचा गर्व
माणसापेक्षा पैसा महत्त्वाचा झाला
माणूस माणसापासून दुरावला

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

# त्रिभाषा धोरणाचा जीआर काढणे आणि रद्द करणे हा तर सरकारचा राजकीय डाव!

हिंदी सक्तीच्या जीआर वरून असे लक्षात येते की याचा राजकारणावर काय परिणाम पडू शकतो किंवा याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला किती आणि कसा घेता येईल यावर सत्ताधाऱ्यांचे लक्ष असावे.त्याचप्रमाणे सरकारने हिंदी सक्तीचा जीआर आणताच विरोधीपक्ष एक्टीव्ह मोडमध्ये आला आणि विरोधकांची मोचेर्बांधणी सुरू झाली.याच निमित्ताने दोन्ही ठाकरे गट एकत्र आल्याचे पाहून आणि ५ जुलैला मोर्चा निघणार सोबतच संपूर्ण विरोधी पक्ष एकवटल्याचे पाहून आपल्या सरकारवर हिंदी भाषेच्या सक्तीचा विपरित परिणाम होऊ शकतो आणि महायुतीमध्ये सुध्दा यावर एकमत दिसत नसल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय हेतूने मराठी माणसाची फसवणूकच म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या ह्रुदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे.राज्यात गेल्या आठवड्यापासुन हिंदी व मराठी भाषेचा रणकंदन सुरू होते. परंतु मराठी माणूस एकवटल्याने सरकारला झुकावे लागले व हिंदी सक्तीचा जीआर सरकारला रद्द करावा लागला.परंतु यात सरकारकडुन राजकारण झाल्याचे अवश्य दिसून येईल. कारण राज्य सरकारने कोणाच्या तरी दबावाखाली हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय घेतला असावा असाही कयास लावला जात आहे.कारण राज्यात पुर्वी त्रिभाषीक पध्दत होती तीच योग्य होती ही बाब आता स्पष्ट दिसून येते. देशातील कोणतेही राज्य असो प्रथम प्राधान्य मातृभाषेलाच हवे. त्यानंतर राष्ट्रीय भाषा आणि त्यांच्या नंतर इंग्रजी किंवा इतर भाषेला प्राधान्य द्यायला हवे. आतापर्यंत मातृभाषा, राष्ट्र भाषा व नंतर इंग्रजी किंवा इतर भाषा असा क्रम पुर्वी पासुनच आहे आणि त्याचे महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्विकारले आहे.राज्यात हिंदी भाषेचा विरोध मुळातच नाही. परंतु राजकीय पुढारी राजकारणाला वेगळे वळण देण्यासाठी विद्यार्थ्यांना हिंदी भाषा वेळेच्या आधी सरकार लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. आज देशाची उपराजधानी व औद्योगिक राजधानी म्हणून मुंबई ओळख जगभर आहे ही बाब जगजाहीर आहे. परंतु परप्रांतीयांनी मुंबईमध्ये जनुकाय मराठी भाषेवर आक्रमक केले की काय असे वाटत आहे.कारण बॉलीवूड क्षेत्र आणि हायप्रोफाइल मध्ये वावरणारे जास्तीत जास्त लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात आणि परप्रांतीय लोक हिंदी भाषेचा वापर करून मराठी भाषेला डावलण्याचा प्रयत्न करतात.यामुळे याचा विपरीत परिणाम मराठी भाषेवर व मराठी माणसावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.पुर्वी पहिली ते चौथी पर्यंत हिंदी भाषेची सक्ती नव्हती. हिंदी विषय हा पाचवीपासून सुरू व्हायचा म्हणजेच मातृभाषा परीपक्व झाल्यानंतर हिंदी भाषेचा व इतर भाषेचा विचार केला जात असे.परंतु सरकार राज्यात पहिलीच्या वगार्पासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याचा प्रयत्न करीत होती.परंतु सरकारचा डाव फसला आणि याचा सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला झुकावे लागले व त्रिभाषा धोरणाचे दोन्ही जीआर रद्द करावे लागले.कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल. जर हिंदी पहिल्या वगार्पासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे.ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे. राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत ते बाजूला सारून नव्याने भाषा वाद निर्माण करून आणि त्याचा राज्यातील जनतेचा मोठ्या प्रमाणात विरोध पहाता हिंदी सक्तीचा जीआर रद्द करावा लागला.कारण राज्याच्या जनतेला सरकारने व्दीधेत टाकून ज्वलंत प्रश्नांवर सरकार पडदा टाकत आहे की काय असे चित्र दिसत होते. आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे ते अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल नकोच.या भाषा वादामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा जय विजय झाला नसुन फक्त मराठी माणसाचा विजय झाला आहे.जय महाराष्ट्र!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## वात्रटिका

### वादळ घोंगावले

कौतुक करताना ते
असे काही बोलले...
कोलित मिळाले आयते
नि नवेच वादळ घोंगावले...
भानगड, मारामारी, जेल, मर्डर
या गोष्टी नेत्यांची ओळख आहे...
कितीही शुभ्र कापडात राहा
हा डाग मात्र ठळक आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## जिथं बाळासाहेबांचं पहिलं भाषण...

**नेमकी काय माहिती समोर आली आहे?**

मिळालेल्या माहितीनुसार राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या मुंबईत होणाऱ्या विजयी मेळाव्याचे ठिकाण ठरलेले आहे. येत्या 5 जुलै रोजी हा विजयी मेळावा होणार आहे. मुंबईतील दादरमध्ये असलेल्या शिवाजी पार्कात हा ऐतिहासिक मेळावा होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर 19 जून 1966 रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी पहिले भाषण केले होते. शिवसेनाप्रमुख म्हणून त्यांनी याच जागेवरून संपूर्ण शिवसैनिक तसेच महाराष्ट्राला संबोधित केले होते. त्यांच्या या भाषणानंतर शिवसेनेची वेल विस्तारतच राहिली. आता याच ठिकाणी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊन भाषण करणार आहेत.

**उद्धव ठाकरे यांनी केले होते आवाहन**

राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय रद्द करावा म्हणून ठाकरे गट आणि मनसेने संयुक्तपणे 5 जुलै रोजी मोर्चा काढण्याचं ठरवलं होतं. पण त्याआधीच सरकारने हिंदी सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करून या मोर्चामधील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण आमचं उद्दीष्ट साध्य झालं असलं तरी शिवसैनिक तसेच मराठी भाषाप्रेमी येत्या 5 जुलै रोजी जमणार आहेत. हा हिंदी सक्तीविरोधातील मोर्चा नसेल पण हा विजयी वेळावा असेल असे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले होते. तसेच त्यांनी यात मनसेनेही सहभागी व्हावे, असे आवाहन केले होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# वारकरी कुटुंबाशी कनेक्ट राहण्यासाठी चार्जिंगची सोय

## झेडपीची यंत्रणा: पंढरीच्या दारी वारकरी मोबाईल चार्जिंग करी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मानाच्या पालख्यांबरोबर पायी चालत येणाऱ्या वारकऱ्यांना आपल्या कुटुंबाची ख्याली– खुशाली विचारण्यासाठी व्यत्यय येऊ नये म्हणून मोबाईलला चार्जिंग करता यावे म्हणून पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून पंढरीच्या दारी वारकरी मोबाईल चार्जिंग करी यासाठी 5 ऊर्जा वाहनाची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

संतांच्या पालख्यांबरोबर अनेक वारकरी दुरून काही चालत येत असतात बरेच दिवस ते कुटुंबापासून दूर असतात दिवसभर चालून थकल्यावर संध्याकाळी मुक्कामाच्या ठिकाणी निवाऱ्याला आल्यावर कुटुंबांशी त्यांचा संपर्क सुरू असतो.



अशात मोबाईलला चार्जिंगची व्यवस्था न झाल्यास त्यांचा संपर्क तुटतो. वारकऱ्यांना ही समस्या भेडसावून नाही म्हणून जिल्हा परिषद प्रशासनातर्फे पालखी मार्गावर 5 ऊर्जा वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. या वाहनावर एकाच वेळी 100 मोबाईल चार्जिंग करता येणार आहेत. तसेच या वाहनावर असलेल्या डिस्प्ले द्वारे शासनाच्या विविध योजनांचा प्रचार करण्यात येणार आहे.

ऊर्जा वाहन पालखी सोहळ्या बरोबर पुढे सरकणार आहेत. विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी या वाहनांचे अविरत सेवा राहणार आहे यासाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

ग्रामपंचायत विभागावर अनेक जबाबदाऱ्या देण्यात आलेल्या आहेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी व कर्मचारी पालखी महाआरगावरील सर्व सुविधा अमलात आणण्यासाठी कार्यरत राहणार आहेत पालखी मार्गावर वळणाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत या फलकावर पालखी तळ हिरकणी कक्ष पिण्याचे पाणी गावचा नकाशा वारकरी सुविधा केंद्र आरोग्य केंद्र कचरा संकलन शौचालय व स्नानगृहाची माहिती देण्यात आली आहे.

**कचरा संकलन...**

पालखी सोहळ्या बरोबरचे वारकरी व दिंडोप्रमुखांना कचरा संकलित करण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देण्यात येणार आहेत याद्वारे कचरा संकलित करण्यात येणार आहे तसेच ठीक ठिकाणी कचरा कुंड्या उभारण्यात येणार असून ग्रामपंचायतीच्या घंट्या गाड्या मार्फत ग्रीन शेडमध्ये हा कचरा संकलित करून विल्हेवाट लावले जाणार आहे.

वारकऱ्यांच्या सुविधेसाठी राबणारे कर्मचारी व स्वयंसेवकांना पावसापासून संरक्षण मिळवण्यासाठी रेनकोट देण्यात येणार आहेत तीन पाळीमध्ये हे कर्मचारी काम करणार आहेत.

# कक्कय्या आर्थिक विकास महामंडळासाठी प्रयत्न सुरू - सुशीलकुमार शिंदे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** मागासवर्गीय गटात ढोर समाज संख्येने कमी असला तरी आर्थिक विकास महामंडळाची गरज आहे आणि त्यासाठी राज्यशासनाकडे पाठपुरावा करून कक्कय्या आर्थिक विकास महामंडळासाठी प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले. ढोर समाजाच्या देशव्यापी मेळावा रविवारी हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, धमार्जी सोनकवडे, गुरूमाता, राजेश खंदारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. समाजाचा विकास करायचा असेल तर मी समाजासाठी काय योगदान दिले आहे याचे आत्मचिंतन करून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. पुर्वीच्या लोकांनी काय केले त्यापेक्षा यापुढे काय करायचे आहे यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आपला समाज लोकशाही मानणारा आहे. आम्ही मूठभर असलो तरी सुशिक्षित आहोत. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात



संघर्ष केला पाहिजे तरच यश प्राप्त होते कोणत्याही कामाला लाज वाटू देवू नका असेही सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले. आरक्षण वर्गीकरणामुळे समाजावर काय परिणाम होणार आहे हे पुढील काळात समजेल परंतु आपण आपल्या पुढच्या पिढीला चांगले शिक्षण देवून सक्षम केले पाहिजे असेही शिंदे यांनी सांगितले.

प्रत्येकाला जातीचा अभिमान असला पाहिजे आणि प्रत्येकाने समाजासाठी काम केले पाहिजे समाजातील मुलींना चांगले शिक्षण दिले पाहिजे असे आपल्या मनोगतामधून माजी केंद्रीय मंत्री रत्नमाला सावनूर यांनी व्यक्त केले.

समाजाच्या विकासासाठी मी कायम सोबत राहणार आहे अनेक अडचणी आहेत आरक्षणामध्ये इतर जाती घुसल्यामुळे आपल्या समाजावर अन्याय होत आहे संघर्ष करावा लागणार आहे त्यासाठी प्रत्येकाने तयारी ठेवली पाहिजे असे प्रतिपादन माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केले.प्रारंभी या मेळाव्याचे संयोजक लक्ष्मीदास सोनकवडे यांनी प्रास्ताविक करीत समाजात अंतर्गत जनगणना केली तर आपण किती आहोत याची संख्या कळेल त्यासाठी मोहीम राबवण्यात येत आहे सर्वांनी सहकार्य करावे.

समाजातील सक्षम असलेल्यांनी मागे राहिलेल्या समाजबांधवाना मदतीचा हाथ दिला पाहीजे ज्यांच्याकडे आहे त्यांनी ज्यांच्याकडे नाही अशा लोकांना मदत केली तर समाज सुधारणा व्हायला वेळ लागणार नाही असे त्यांनी सांगितले. दिपप्रज्वलन आणि संत कक्कय्या, शिवाजी महाराज, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आदी राज्यातून आलेल्या अनेक मान्यवरांचे स्वागत करण्यात आले त्यानंतर देशभरात समाजाचे नावलौकीक वाढवणाया गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रविण होटकर आणि वनिता होटकर यांनी केले तर आभार सटवाजी होटकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सुधीर खरटकमल, मुन्ना कटके, सच्चिदानंद होटकर, अशोक सदाफुले, रविंद्र शिंदे, संगीता जोगधनकर, शारदा शिंदे, ॲड विद्या कटकधोंड, राजेश कटकधोंड, विनोद होटकर,नित्यानंद सोनकवडे, विनायक होटकर, गणेश शिंदे यांच्यासह अनेकांनी विशेष परिश्रम घेतले. दिवसभर हुतात्मा स्मृती मंदिरात झालेल्या या मेळाव्यासाठी ढोर समाजबांधवांनी मोठ्यासंख्येने गर्दी केली होती.

# शिक्षकांनी अध्यापनात नविन तंत्रज्ञानाचा वापर करावा- दिगबर काळे

**माढा (कटूसत्य वृत्त):–** सध्याच्या काळात शिक्षकांनी अध्यापनात नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करुन अध्यापन करावे. आपण जो व्यवसाय पेशा स्वीकारला त्याच्याशी प्रामाणिक राहून त्याला वेगळ्या उंचीवर नेऊन प्रामाणिकपणे केलेले काम नक्कीच यशस्वी होते. सकारात्मक राहून बदल स्वीकारला तर आपले उद्दिष्ट साध्य होते शिक्षक बदलला तर शिक्षण बदलेल शिक्षण बदलले तर समाज बदलेल यासाठी आखावी व रेखीव काम करा. जीवन समृद्ध होईल. आपल्या व्यवसायाचा गुणात्मक दर्जा सुधारला तर नवनिर्मिती करणारी पिढी घडेल असे मत उपळाई बुद्रुक केंद्राच्या शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी म्हटले आहे.चालू शैक्षणिक वर्षाची



पहिली शिक्षण परिषद श्री.नंदिकेश्वर विद्यालय उपळाई बु येथे नुकतीच पार पडली.त्यावेळी ते बोलत होते. वडाचीवाडी येथील पा.व.शिंदे यांनी शिक्षण परिषदेमध्ये शिक्षकांना शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास , प्राप्त माहितीचे विश्लेषण यावर सखोल मार्गदर्शन केले.प्रशासकीय बाबी व विनोबा ॲपविषयी धानाजी घाडगे यांनी मुद्देसूदपणे आपले विचार मांडले.याशिवाय बंडू भोरे

नानासाहेब ढेरे, सकिना आतार, बंडू भोरे, प्रगती पाटील, धनाजी घाडगे यांनी उत्कृष्ट व उपयुक्त मार्गदर्शन केले

प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दशरथ देशमुख व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले प्रास्ताविक व सूत्र संचालन शहाजी क्षीरसागर यांनी केले तर आभार पांडुरंग शिंदे यांनी मानले,यावेळी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

# नवीन रास्तभाव दुकानाबाबत जाहिरनामा प्रसिध्द

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शासनाचे धोरण दरवयों सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ करोसीन परवाने तसेच ठेवून, आजमितीस रदद असलेली व यापुढे रदद होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नवीन तसेच विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्त भाव दुकाने मंजूर करण्यात यावीत.

सदरील शासन धोरणानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सोलापूर ग्रामीण मधील सर्व तहसिलदार यांना लेखी पत्र देऊन जाहिरनामा प्रसिध्द करणे बाबतची विहीत नमुन्यातील माहिती मागविण्यात आलो होती. सदर प्राप्त माहितीच्या आधारे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सोलापूर जिल्हाधिकारी यांची नवीन जाहिरनामा प्रसिध्दीकरणास परवानगी घेऊन आज दि. 30 जुन 2025 रोजी खालील तालुक्यामधील गावांमध्ये नवीन दुकान मंजूरीसाठी जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर जाहिरनामा पाहणेसाठी सर्व तहसील कार्यालयाचे व जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

तरी इच्छूक पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था), नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांनी विहीत नमुन्यात संबंधित तहसिलदार यांचे कार्यालय येथे दिनांक : 01 जुलै 2025 पासून 31 जुलै 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वतः सादर करावेत.

सदरील अर्ज तहसीलस्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. त्याचे शुल्क घेऊन अर्ज संबधितास उपलब्ध होतील.

रास्तभाव धान्य दुकान जाहिरनामा सन 2025

उत्तर सोलापूर– मौजे झ अकोलेकाटी –संख्या 1

बार्शी– मौजे – इंदापूर, घोळवेवाडी, नांदणी, सर्जापूर, हिंगणी पा., दडशिंगे, चिखर्डे, सासुरे – एकुण संख्या 8

दक्षिण सोलापूर– बिरनाळ व चिंचपूर – एकुण संख्या 2

अक्कलकोट – मोजे चपळगाव, मराठवाडी, किणी, कुमठे व परमानंद तांडा बबलाद –एकुण संख्या 5

पंढरपूर – मौजे, टप्पा, तरटगांव, देगांव, पंढरपूर प्रभाग क्र. 17, फुलचिंचोली– एकुण संख्या 5 मोहोळ – मौजे बेरागवाडी, पिरटाकळी , शेटफळ, चिंचोलीकाटी, भैरववाडी– मनगोळी– एकुण संख्या–5

माढा झमौजे तांबवे, रांझणी, खैरेवाडी, पिंपळनेर– एकुण संख्या–4 करमाळा– मौजे पोटेगाव झएकुण संख्या–1 सांगोला झमौजे गावडेवाडी, घेरडी. एकुण संख्या–2 मंगळवेढा– मौजे) सिध्दापूर. रहाटेबाडी, हिवरगाव, डोणज, खुपसंगी, मेटकरवाडी, महमदाबाद हू., मंगळवेढा, अवताडेवाडी –एकुण संख्या–9

माळशिरस– मौजे सरगरवाडी– एकुण संख्या 1

एकुण दुकाने–43

अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांनी दिली आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**

**ई–निविदा सुचना क्रमांक १० सन २०२५–२६ (ऑनलाईन)**

**''बी–१ निविदा''**

**(सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त वर्ग–अ)**

संदर्भ:– महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४ /इमा–२/मंत्रालय मुंबई –०३२ दि. १४/०२/२०२५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर – ४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां.विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या (सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त) यांचेकडून खालीली कामा करिता ''बी–१'' नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | दि.०१/०७/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते ०८/०७/२०२५ ( सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ---निरंक--- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि. ०८/०७/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा :- शर्त ८.१) | ई–निविदा पोर्टलवर ''बीड लॉक'' झाल्यानंतर ७२ तासात ''हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे.<br>१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि. १०/०७/२०२५ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in

(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/– (मनोज रा. ठाकरे)**

**कार्यकारी अभियंता,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/६०/२०२५–२६

# चरणसेवा उपक्रमावर वारकरी बांधव खुश भाविकांनी मानले शासनाचे आभार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात धर्मपुरी येथे फुट मसाज ची चरणसेव्चा शुभारंभ ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर उभारणेत आलेल्या चरणसेवा केंद्रातील वारकरी बांधव यांचेशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संवाद साधला. स्वयंचलित फुट मसाज मुळे चालून चालून थकलेले पायांना आराम मिळत असलेने या सेवेवर वारकरी जाम खुश आहेत. जिल्हा परिषदेचे सिईओ कुलदीप जंगम यांनी सर्वाधिक फुट मसाजवर वारकरी यांचे



साठी वेळेत उपलब्ध करून दिले आहेत. धर्मपुरी, कारूंडे बंगला, शिंगणापूर फाटा, तसेच सर्व मुख्यमंत्री सहाय्यता निवारा कक्षात हे फुट मसाजर बसविणेत आले आहेत. या सर्व केंद्राचा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी भेट देऊन वारकरी यांचेशी संवाद साधला. सिईओ कुलदीप जंगम यांचे मार्गदर्शना खाली जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील त्यांचे टीम ने लक्ष घालून कमी कालावधीत मोहिम पध्दतीने चरण सेवा साठी फुट मसाजर उपलब्ध करून दिले आहेत. प्रशिक्षणासह १५० पेक्षा अधिक कर्मचारी या चरणसेवा साठी तैनात करणेत आले आहेत. चरणेसेवे साठी रांगा

आळंदी ते धर्मपुरी १४० किमीचा पायी प्रवास करून थकलेले पाय मशीन द्वारे दाबून घेणे साठी रांगा लागले आहेत.

महिला साठी स्वतंत्र कक्ष करणेत आलेला आहे.

वृध्द भाविकांची चरण सेवे साठी झुंबड उडाली आहे. विशेष ती महिला भाविकांची संख्या अधिक आहे. बंदोबस्त साठी आलेले पोलिस कर्मचारी व अधिकारी देखील या चरणसेवेचा लाभ घेत आहेत. या चरण सेवेसाठी कक्ष अधिकारी अविनाश गोडसे व कक्ष अधिकारी झेड ए शेख यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**–: संपर्क :–**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15

**सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शाहु महाराजांचे विचार प्रेरणादायी- संभाजी घाडगे



**माढा (कटूसत्य वृत्त):–** आरक्षणाचे जनक असलेले छत्रपती राजर्षी महारांजानी अठरा पगड जातीच्या गोरगरीब जनतेसाठी आधारवड होते.त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी होते.सोशल मिडीयाच्या जाळ्यापासून थोडसं अलिप्त होऊन शाहु महाराजांचे चरित्र प्रत्येकांनी अभ्यासावे असे मत मराठा उद्योग कक्षाचे व्याख्याते संभाजी घाडगे यांनी मांडले. माढ्यात सह्याद्री बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राजर्षी शाहु महाराजांचा जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी घाडगे बोलत होते. प्रारंभी शाहु महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन केले.यावेळी औंदुबर पवार यांनी जिजाऊ वंदना गायन केली.मंचावर रोटरी क्लबचे उप प्रांतपाल डॉ.सुभाष पाटील,डॉ.कुमार गायकवाड, सह्याद्री संस्थेचे अध्यक्ष दत्ताजी शिंदे आदी उपस्थित होते.संस्थेच्या वतीने शुन्यातुन विश्व निर्माण करुन जिद्द चिकाटीच्या बळावर व्यवसाय क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या बाळासाहेब गडदे यांना उद्योजकता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.संस्थाध्यक्ष दत्ताजी शिंदेनी संस्थेच्या माध्यमातुन राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहीती मांडली.डॉ सुभाष पाटील,डॉ. कुमार गायकवाड यांनी शाहु महाराजांविषयी विचार मांडून सह्याद्री संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी शारदा शिंदे,धनश्री शिंदे, पिंकुताई मस्के, मिनाक्षी गुंड, देविदास कन्हेरे, प्रा.हरिदास इंगळे, नवनाथ विभुते, जयदीप शिंदे आदी उपस्थित होते. सुहास चवरे, श्रीकांत काशिद यांनी सुत्रसंचलन तर संदीप शिंदेनी आभार मानले.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दहा (हिंदीत) २) जहाज ३) वाघ (हिंदीत) ४) एक अभिनेता - कमल *** ५) गायीचे पिल्लू ६) मुस्लीम बांधवांचा एक सण ८) एक प्रख्यात आध्यात्मिक प्रवचनकार- ***** पै ११) मनसे अध्यक्ष-** ठाकरे १३) एखादी वस्तू खाण्याची वा पिण्याची झालेली अनावर इच्छा १५) अगदी मंद गतीने १६) शिवसेनेचे मुखपत्र असलेले दैनिक १७) अस्वलांचा खेळ करणारे १८) भिंतीवरील सरपटणारा प्राणी २१) भारताचे माजी पंतप्रधान-*** नेहरू२३) समुद्राच्या पाण्याची चव २५) महिना २६) वरल्या मनाने २७) चलाख, त्वरेने हालचाल करणारा २८) एक औषधी काटेरी पानांची वनस्पती २९) विहिरीतून पाणी उपसण्याचे पूर्वीचे साधन ३०) ससा आणि *** याच्या शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ३१) साखळी, **कोयंडा ३२) पूर्ण गच्च भरलेले, हाऊसफुल ३४) माकड ३८) बेचव ४०) सांडपाणी वाहणारा नाला ४२) अतिशय मोठे असे ४३) ब्रेड (मराठीत)

**आडवे शब्द :** १) पुणे येथील प्रसिध्द गणपती ७) महाराष्ट्राशेजारचे राज्य ९) मनातील खंत १०) शर्ट (मराठीत) १२) एक म्हण - ** घर पोकळ वासा १३) शरीर १४) एक प्रगत देश १७) आठवड्याचे दिवस १६) वर्ष (हिंदीत) १९) थंडीत गळ्याभोवती गुंडाळतात तो २०) लपाछपीचा खेळ २२) फॅक्टरी २४) टाईम (मराठीत) २५) आईची बहीण २७) भाकरीचा एक चतुर्थांश भाग ३०) खर्चात केलेली बचत ३२) बारा वर्षांचा काळ ३३) उपरोधिकपणे एखाद्याला बोलणे-दिल्या घरी सुखी ** ३४) गंध, परीमळ ३५) मुरमाड जमीन, रांग ३६) दोन दरवाजे किंवा खिडकीच्या दारामधील किंचितसी मोकळी जागा, भेग ३७) मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवाला घातलेले साकडे ३९) एक मुस्लीम संत ४०) किल्ला ४१) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) जेवताना बसावयाची लाकडी फळी ४४) नशीब (इंग्रजीत) ४५) खेळावयाच्या पत्त्याच्या पानातील एक प्रकार, बदाम-इसपिक- .... ४६) शंभर (हिंदीत)

## सुडोकु - 289

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 1 | | | 4 | | | 2 |
| 6 | | 9 | 5 | | 7 | 3 | 8 | |
| | | 7 | | | | 4 | | |
| | | 6 | 3 | | 2 | | 1 | |
| 2 | 1 | | | | | | | 6 |
| 7 | | | 9 | | | 8 | 2 | 4 |
| 3 | | | 6 | | 1 | 2 | | 8 |
| 9 | 6 | | 7 | | | 1 | | 5 |
| | | 5 | 2 | | | 6 | 7 | |

